ePaper
उदयनराजेंना प्रतीक्षाच; भाजपकडून उमेदवारी जाहीर न केल्याने नाराजी



॥ वर्ष - 7 । अंक - 323 ॥ UDYAM-MH-26-0158827 ॥

महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com ॥ शनिवार, दिनांक 12 एप्रिल 2024 ॥ पिंपरी-चिंचवड आवृत्ती ॥ mahaenews.com ॥ maha_enews ॥ Mahaenews

## आतील पानांत

- दिल्लीचा लखनऊवर विजय
- आता भाजपा हेच माझं अस्तित्व
- भारताची शस्त्रास्रे नष्ट करण्याचा कट
- महायुतीत वादाची ठिणगी?

## शहरात 112 आपला दवाखाना

# मनपा रुग्णालये ‘ताणमुक्त’!

### » आयुष्यमान भारत आरोग्य मंदिराची होणार निर्मिती

**। पिंपरी ।महाईन्यूज**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या मोठ्या रुग्णालयांमधील रुग्णांची गर्दी आता कमी होणार आहे. शहरातील विविध भागात आता आपला दवाखाना आणि आयुष्यमान भारत आरोग्य मंदिर सुरू करण्यात येणार आहे. शहरात सध्या १६ क्लिनिक सुरू असून एकूण ११२ प्राथमिक केंद्र सुरू करण्याचे महापालिकेचे नियोजन आहे. ते सुरू झाल्यास नागरिकांची गैरसोय टळणार आहे.**








पिंपरी-चिंचवड महापालिकेची आठ मोठी रुग्णालये आहेत. या रुग्णालयांमध्ये शहरातील नागरिक मोठ्या प्रमाणात उपचार घेण्यासाठी नागरिक दाखल होत आहेत. सकाळच्या दरम्यान या रुग्णांलयांमध्ये मोठी गर्दी होते. गर्दीअभावी अनेक रुग्णांवर वेळेवर उपचार घेण्यात अडचणी येत आहेत. त्यावर उपाय म्हणून केंद्र आणि राज्य सरकारने शहरातील विविध भागात आपला दवाखाना आणि आयुष्यमान भारत आरोग्य मंदिर निर्माण करण्यासाठी पाऊले उचलली आहेत. पिंपरी-चिंचवड शहरात तब्बल ११२ नवीन केंद्रे सुरू करण्यात येणार आहेत.

सध्या शहरात ३३ आपला दवाखाना सुरू करण्यात येणार आहेत. तर आयुष्मान भारत आरोग्य मंदिर ७९ उभारण्यात येणार आहे. सध्या सहा आपला दवाखाना तर दहा आयुष्यमान भारत आरोग्य मंदिराची निर्मिती करण्यात आली आहे. उर्वरीत लवकरात लवकर सुरू करण्याचे शासनाचे प्रयोजन आहे. मोठ्या रुग्णालयात रुग्णांची गर्दीही अधिक असते. सर्दी, तापावर उपचार घेणाऱ्यांबरोबरच उच्च रक्तदाब, मधुमेह आदीसह विविध आजारांचे आणि गंभीर रुग्णही उपचारासाठी दाखल होतात. त्यामुळे प्राथमिक आजारावर उपचार घेणाऱ्या रुग्णांमुळे उर्वरीत गंभीर आजाराच्या रुग्णावर उपचार घेण्यास विलंब होण्याच्या तक्रारी येत होत्या. आपला दवाखाना आणि आयुष्यमान भारत आरोग्य मंदिराची निर्मिती झाल्यास त्याठिकाणी प्राथमिक आजारांवर उपचार होतील. परिणामी मोठ्या रुग्णालयात गंभीर आजाराच्या रुग्णांवर देखील उपचार करताना होणारी गैरसोय टळणार आहे.

### जागांवर आरक्षण ; जागा मिळेना

**» आपला दवाखाना आणि आयुष्यमान भारत आरोग्य मंदिर सुरू करण्यासाठी जागेची अडचण येत आहे. महापालिकेच्या विविध जागांचा पर्याय तपासण्यात आला होता. मात्र कोणते कोणते आरक्षण असल्यामुळे जागा मिळण्यात अडचणी येत होत्या. त्यामुळे खासगी जागेत भाडे तत्वावर हे आरोग्य केंद्र सुरू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. मात्र त्यालाही जागा मालक प्रतिसाद देत नसल्यचे चित्र आहे.**

## भोसरी, शिरूरमध्ये ६५ लाख रुपयांची रोकड आणि वाहन जप्त

### » भरारी पथकांतर्फे विविध ठिकाणी जिल्ह्यात येणाऱ्या वाहनांची तपासणी

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

जिल्ह्यात लोकसभा सार्वत्रिक निवडणुकांसाठी आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली असून भरारी पथकाद्वारे आचारसंहितेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. पोलीस पथक आणि भरारी पथकांद्वारे दोन विविध घटनांमध्ये सुमारे ६५ लाखांची रोकड आणि एक वाहन ताब्यात घेण्यात आले आहे.

आचारसंहिता काळात ५० हजार रुपयांपेक्षा जास्त रोख रक्कम जवळ बाळगता येत नाही. भरारी पथकांतर्फे विविध ठिकाणी जिल्ह्यात येणाऱ्या वाहनांची तपासणी करण्यात येत आहे. भोसरी एमआयडीसी पोलिसांनी भोसरी एममआयडीसी पोलीस स्टेशन जवळील सी सर्कल जवळ ८ एप्रिल रोजी मध्यरात्री फॅन्सी नंबर प्लेट असलेली आणि संशयास्पदरितीने फिरणारी काळ्या रंगाची फॉरच्यूनर



गाडी आढळून आली. पोलीसांनी अधिक तपास करून गाडीतून १३ लाख ९० हजाराच्या ५०० रुपयांच्या नोटा आणि ३० लाख रुपये किंमतीचे वाहनही पंचासमक्ष पंचनामा करुन जप्त केले आहे.

### प्राप्तिकर विभागाच्या चौकशीनंतर पुढील कार्यवाही

**» तर दुसऱ्या एका घटनेत १० एप्रिल रोजी दुपारी शिरुर पोलीस स्टेशनच्या कर्मचाऱ्यांना शिरुर नगर परिषद क्षेत्रातील कमान पूलाजवळ एका खाजगी वाहनातून ५१ लाख १६ हजाराची रक्कम नेली जात असल्याचे पाहणीत आढळून आले. याबाबत माहिती मिळताच भरारी पथकातील कर्मचाऱ्यांनी प्राप्तिकर विभागाला याबाबत माहिती दिली. सदर रक्कम कोषागारात ठेवण्यात आली असून प्राप्तिकर विभागाच्या चौकशीनंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी अजय मोरे यांनी दिली आहे.**

# शरद पवारांचा धृतराष्ट्र झालाय!

## अजितदादांच्या महिला शिलेदाराची सडकून टीका

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बारामती लोकसभा मतदारसंघात पवार काका पुतण्यामध्ये सुरू असणारा राजकीय संघर्ष आणखीन वाढताना दिसत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दोन दिवसांपूर्वी बारामतीमध्ये बोलत असताना "बारामतीकरांनी साहेबांना निवडून दिलं, लेकीला निवडून दिलं आता सुनेला निवडून द्यावं, बारामतीकर हे कायम पवार नावाच्या पाठीमागे उभे राहतात" असे विधान केलं होत.**

अजितदादांच्या या विधानाचा समाचार घेत 'मूळचे पवार आणि बाहेरून आलेल्या पवारांमध्ये फरक आहे' म्हणत शरद पवारांनी सुप्रिया सुळे या मूळ तर सुनेत्रा पवार या विवाहानंतर पवार झाल्याचे अप्रत्यक्षरीत्या दर्शवण्याचा प्रयत्न केला. शरद पवारांच्या विधानावर आता अजित पवार गट चांगलाच आक्रमक झाल्याचं दिसत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या फायर ब्रँड महिला नेत्या रूपाली पाटील यांनी शरद पवार यांच्यावर सडकून टीका करतानाच त्यांचा धृतराष्ट्र झाला असल्याचं म्हटलं आहे. "सासरी नांदायला आलेली सून परक्या ठिकाणाशी जन्मोजन्मीचे नाते जोडते. ते काही सहजपणे शक्य होत नाही. त्यासाठी सासरी नांदायला आलेल्या त्या मुलीच्या आतड्याला कितीदा पीळ पडतो, माहेरच्या आठवणीने जीव किती तीळ तीळ तुटतो, कितीदा ती अश्रू ढाळते हे सासरी नांदायला आलेल्या मुलीला आणि तिला नांदायला पाठवणाऱ्या बापलाच कळू शकेल. अन्य कोणालाही नाही. शरद पवार साहेब यांच्यासारख्या स्वतःची विशिष्ट प्रतिमा निर्माण करण्यात हयात घालवलेल्या नेत्याने मात्र तमाम सासुरवाशीनींचा हा त्याग मातीमोल ठरवला आहे" अशी टीका पाटील यांनी फेसबुक पोस्टच्या माध्यमातून केली आहे. राजकारणात स्वतःची पुरोगामी प्रतिमा निर्माण करन्यासाठी स्वतःभोवती कायम एक प्रभावळ मिरवणाऱ्या शरद पवार साहेब यांनी स्वतःच स्वतःच्या कथनी



करनीतून त्या विचारांच्या यापूर्वीही अनेकदा चिंधड्या उडवल्या आहेत. मग ते राजू शेट्टींची जात काढणे असो, भाजपाने छत्रपती संभाजीराजे यांना राज्यसभेवर खासदार म्हणून संधी दिल्यानंतर छत्रपतींच्या गादीला कमी लेखनारे अवमानजनक वक्तव्य असो, स्व. प्रभा राव या महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या अध्यक्षा असताना या ज्येष्ठ महिला नेत्याबद्दल, " माणसं म्हातारी झाली की कावल्यागत करतात" हे वक्तव्य असो, की ज्येष्ठ नेते माजी मंत्री दादा जाधवराव ६९ वर्षांचे असताना त्यांच्याबद्दल तसेच स्व. सदाशिवराव मंडलिक या एकेकाळच्या स्वतःच्याच सहकाऱ्याबद्दल बोलताना "बैल म्हातारा झालाय त्याला बाजार दाखवा" असे कसाई धार्जिणे केलेले वक्तव्य असो. यातून कोणता विचार त्यांनी जपला? एका जाहीर सभेत तर त्यांनी तृतीपंथीयांची चक्क अक्टिंग करून त्यांना देखील कमी लेखत मारलेली स्टाईल कुठल्या समतेच्या विचारधारेत बसते? त्यांच्याही लेखी हा वर्ग थट्टेचा विषय असेल तर त्यांची खरी मानसिकता काय आहे? हे दिसून आले. सून परकी, बाहेरची अशा आशयाचे त्यांचे वक्तव्य म्हणजे शरद पवार यांचाही धृतराष्ट्र झाला आहे, हेच सिद्ध होते. कन्या प्रेमाने त्यांनी जणू स्वतःच्या डोळ्यावर पट्टीच बांधली आहे. या आंधळ्या प्रेमात मात्र त्यांनी आई, पत्नी आणि तमाम सासुरवाशींच्या, त्यागाला, त्यांनी जीव जाळून आणि मान मोडून सासरी राबत पार पाडलेल्या कर्तव्याला मातीमोल ठरवून स्वतःचेही पाय मातीचे असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. जाता जाता एक विषय. शरद पवार साहेब यांनी स्वतःचीच सून असणाऱ्या सौ. सुनेत्रा पवार यांना नजरेसमोर ठेवून तमाम सासुरवाशीनींना परकं, बाहेरचं अगदी ग्रामीण भाषेत सांगायचं म्हटलं तर उतावडं ठरवलं आहे. मात्र त्या सुनेत्रा पवार यांच्या माहेरची मुळं बारामतीच्याच मातीत आहेत. त्या अर्थाने त्यांचं माहेरही बारामती आणि सासरही बारामती. वास्तविक अशा गोष्टींची कधी राजकारणात चर्चा करायची नसते. पण तमाम महिलांचा अवमान होत असताना काही गोष्टी निदर्शनास आणून देणं आवश्यक असतं. अन्यथा आजपर्यंत खूप काही सोसलेल्या, पिचलेल्या सासुरवाशीनींचे कर्तुत्व, कर्तव्य अशा एका वक्तव्याने हकनाक निकालात निघेल. सासरसाठी प्रसंगी प्राण अर्पण करणाऱ्या, सासरचा मान मरातब जपण्यासाठी माहेरला कायमचे, तोडणाऱ्या सासुरवाशीनींची परंपरा पवार साहेब विसरले आहेत. हे वयानुरूप झालेले विस्मरण, की त्यांचा पुरुषी मानसिकतेचा खरा चेहरा? पोटच्या लेकीच्या आंधळ्या प्रेमापोटी , लेकी समान सुनांना, शरद पवार साहेबांनी प्रचंड दुखावलेच, वेदनादायक वक्तव्य आहे. त्यांच्या वक्तव्याचा जाहीर निषेध.

### रुपाली पाटील यांची पोस्ट नेमकी काय?

» सासरी नांदायला आलेली सून परक्या ठिकाणाशी जन्मोजन्मीचे नाते जोडते. ते काही सहजपणे शक्य होत नाही. त्यासाठी सासरी नांदायला आलेल्या त्या मुलीच्या आतड्याला कितीदा पीळ पडतो, माहेरच्या आठवणीने जीव किती तीळ तीळ तुटतो, कितीदा ती अश्रू ढाळते हे सासरी नांदायला आलेल्या मुलीला आणि तिला नांदायला पाठवणाऱ्या बापलाच कळू शकेल.अन्य कोणालाही नाही. शरद पवार साहेब यांच्यासारख्या स्वतःची विशिष्ट प्रतिमा निर्माण करण्यात हयात घालवलेल्या नेत्याने मात्र तमाम सासुरवाशीनींचा हा त्याग मातीमोल ठरवला आहे. सून बाहेरची असते अशा निर्देशाचे संतापजनक वक्तव्य करून तथाकथित पुरुषी मानसिकतेचे दर्शन घडवले आहे. त्यातून त्यांचेही पाय मातीचेच हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

## पाच पक्ष बदलणारा आणि जनतेला वेळ न देणारा खासदार नको

### शिवाजीराव आढळराव पाटील यांची खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्यावर टीका

।भोसरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोकसभेचे रणांगण तापत असताना आता प्रचाराला देखील रंगत येताना पाहायला मिळत आहे. आरोप आणि प्रत्यारोपाच्या फैरी वाढल्या आहेत. शिरूर लोकसभेत देखील हेच चित्र पाहायला मिळत आहे. जनतेला वेळ न देणारा आणि पाच पक्ष बदलून आलेला खासदार नको म्हणत आढळराव पाटील यांनी खासदार कोल्हे यांच्यावर सडकून टीका केली आहे.**




लोकसभेच्या प्रचारानिमित्त बोलताना आढळराव पाटील यांनी ही टीका केली आहे. शिरूर लोकसभेत महायुती आणि महाविकास आघाडीच्या उमेदवाराकडून जोरदार प्रचाराला सुरुवात झाली आहे. खासदार कोल्हे यांना पराभूत करण्याचा निर्धार उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बांधला आहेच. मात्र गेल्या निवडणुकीतील पराभवाचा वचपा काढण्यासाठी माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील देखील शड्डू ठोकून उभे आहेत. दोन्ही उमेदवारांसाठी वरिष्ठ पातळीवरील नेत्यांकडून प्रचाराचे रान उठविले जात आहे. तर उमेदवारही विरोधकांवर शरसंधान साधताना दिसत आहेत. त्याचाच एक पट शिरूर लोकसभेत पाहायला मिळाला. गेल्या पाच वर्षात निवडून आल्यानंतर जनतेमध्ये आपला जनसंपर्क कायम ठेवण्यात खासदार अमोल कोल्हे यांना अपयश आले आहे. त्यामुळे मतदारसंघात त्यांच्याविषयी नाराजीचा सूर आहे.

हाच धागा पकडत शिवाजीराव आढळराव पाटील यांनी कोल्हे यांच्यावर टीका केली. आढळराव पाटील म्हणाले की, गेल्या पाच वर्षात खासदार नसलेला लोकसभा मतदारसंघ अशी शिरूरची ओळख झाली आहे. जनतेला वेळ न देणारा आणि पाच पाच पक्ष बदलणारा नाटककार यांच्यापासून सावध रहा, अशी टीका शिरूरचे माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी केली. निवडून आल्यापासून पाच वर्षात मतदारसंघात लोकप्रतिनिधींनी लक्ष दिले नाही. जनता दरबार घेऊ, सर्व मतदारसंघात प्रचार कार्यालय सुरु करू अशा राजकीय वलग्ना केल्या. मात्र त्यांच्यापासून निराशा मिळाली असल्याचे आढळराव म्हणाले.

### खासदार कोल्हे यांचे मौनच

» आढळराव पाटील यांनी केलेल्या टीकेला खासदार अमोल कोल्हे प्रत्युत्तर देऊ शकले नाहीत. आढळरावांच्या टीकेवर माध्यमांनी अमोल कोल्हे यांना प्रतिक्रिया विचारली असता नो कमेंट्स म्हणत त्यांनी या प्रकारावर बोलणे टाळले.

## त्याग, आदर्शाचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे

# क्रांतिसूर्य महात्मा फुले:संजोग वाघेरे

### क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुलेंना उमेदवार वाघेरे पाटलांकडून विनम्र अभिवादन

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सामाजिक सुधारणा आणि समतेचा विचार रुजविणारे क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले त्याग, आदर्श, साहस ह्यांचे मूर्तिमंत उदाहरण आहेत, असे प्रतिपादन मावळ लोकसभेचे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांनी केले.**



थोर समाजसुधारक क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या जयंतीनिमित्त मावळ लोकसभा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांनी पिंपरीतील क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील, पिंपरी चिंचवड महापालिकेच्या माजी नगरसेविका सुलक्षणा शीलवंत-धर, इंजि. देवेंद्र तायडे, विशाल जाधव, सागर चिंचवडे, मयूर जाधव, जयंत शिंदे, काशिनाथ जगताप, माधव पाटील, योगेश सोनवणे, गणेश काळे, संजय पडवळ, हनुमंत वाबळे, अजय पिल्ले, के डी वाघमारे, अधिकराव चव्हाण, विवेक विधाते, सुशांत खुरासने, दिलीप पानसरे, संगीता खरात, पल्लवी कांबळे, दिपाली मुरकुटे, दीपक गायकवाड, बिभीषण कदम, डॉ. काशिनाथ बामणे, श्रीकांत पवार, प्रतीक जम, अमर भोसले, प्रल्हाद कांबळे यांच्यासह महाविकास

#### महात्मा ज्योतिबा फुले जयंतीच्या दिल्या शुभेच्छा

» संजोग वाघेरे पाटील पुढे म्हणाले, थोर समाजसुधारक क्रांतिसूर्य महात्मा फुले ह्या स्वाभिमानी नेत्याने देशाच्या सामाजिक जीवनात अशी उलथापालथ घडवली की त्याची दखल इतिहासाला घ्यावी लागली. त्याग, आदर्श, साहस ह्याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे महात्मा फुले. त्यांना दिन दुबळ्यांचा कैवारी म्हणून हि संबोधले जाते. स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवण्याचे काम त्यांनी केले. त्याच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांच्या मदतीने समाजातील स्त्रियांना शिक्षण देण्यासाठी धडपडणाऱ्या ज्योतिबांना शैक्षणिक क्रांतीसाठी आपले जीवन अर्पण करणाऱ्या महात्म्यास शत शत वंदन करून उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांनी क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले जयंतीच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या.

---

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त वाहतुकीत बदल

### पिंपरी, भोसरी, हिंजवडी, सांगवी परिसरातील वाहतुकीत बदल

। पिंपरी ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त शहरातील विविध भागात मिरवणुका काढल्या जातात. तसेच पिंपरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी हजारो अनुयायी येत असतात. या पार्श्वभूमीवर पिंपरी, भोसरी, हिंजवडी, सांगवी परिसरातील वाहतुकीत बदल करण्यात आला आहे. हा बदल रविवारी (दि. 14) दुपारी 12 पासून मिरवणुका संपेपर्यंत असणार आहे. याबाबतचे आदेश वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त विशाल गायकवाड यांनी दिले आहेत.**

» महावीर चौक चिंचवड कडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक पिंपरीकडे सर्विस रोडने जाणाऱ्या वाहतुकीस बंदी. या मार्गावरील वाहने चिंचवड डी-मार्ट इन ग्रेड सेपरेटर मार्गे जातील.



» भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त पिंपरी येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन

» नाशिक फाट्याकडून डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक पिंपरीकडे सर्विस रोडने येणाऱ्या वाहनांना बंदी. ही वाहने डेअरी फार्म ग्रेड सेपरेटर इन व एचपी पेट्रोल पंप खराळवाडी ग्रेड सेपरेटर इन मार्गे जातील.

» स्व. इंदिरा गांधी पूल ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक पिंपरीकडे येणाऱ्या सर्व वाहनांना बंदी. ही वाहने मोरवाडी चौक (Pimpri) मार्गे जातील.

» नेहरूनगर चौकाकडून डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक पिंपरीकडे सर्व वाहनांना प्रवेश बंदी. या मार्गावरील वाहने कॉर्नर बस स्टॉप येथून मासुळकर कॉलनी मार्गे जातील.

» जय मल्हार खानावळ सम्राट चौक पासून मोरवाडी चौकाकडे जाणारा मार्ग सर्व वाहनांसाठी बंद असेल.

» सायन्स पार्ककडून मोरवाडी चौकाकडे येणारा मार्ग बंद असेल. या मार्गावरील वाहने ऑटोक क्लस्टर कडून मदर टेरेसा उडान पुलावरून जातील.

» क्रोमा शोरूम कडून गोकुळ हॉटेल कडे जाणारा मार्ग बंद असेल. पिंपरी चौकाकडून पिंपरी पुलाकडे जाणारा मार्ग आवश्यकतेनुसार बंद करण्यात येईल.

» अभिवादन करण्यासाठी येणाऱ्या अनुयायांच्या वाहनांसाठी संत तुकाराम नगर जवळील एचए कंपनीच्या पार्किग मध्ये पार्किंगची सोय करण्यात आली आहे.

» हॅरिस ब्रिज ते फुगेवाडी चौक सर्विस रस्त्याने जाण्यास प्रवेश बंद असेल. हॅरीस ब्रिजने ग्रेड सेपरेटर मार्गे जाता येईल.

» बोपोडी संविधान चौकाकडून दापोडी छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथे जाण्यास बंदी असेल. या मार्गावरील वाहने हॅरिस ब्रिज दापोडी मार्गे इच्छित स्थळी जातील.

» शितळा देवी चौकाकडून दापोडी गावाकडे जाण्यास बंदी असेल. या मार्गावरील वाहने शितळादेवी चौकाकडून सांगवी मार्गे जातील.

» जुनी सांगवी पीएमपीएमएल शेवटचा बस स्टॉप नदी पुलावरून दापोडी कडे जाण्यासंबंधी असेल. या मार्गावरील वाहनांना माकन चौक किंवा ममता नगर चौकातून जाता येईल.

» कस्तुरी चौक ते श्री शिवाजी महाराज चौकाकडे जाणाऱ्या व येणाऱ्या वाहनांना बंदी असेल. या मार्गावरील वाहने कस्तुरी चौक येथून उजवीकडे वळून विनोदी वस्ती मार्गे व डावीकडे वळून इंडियन ऑइल चौक मार्गे जातील.

» मेझा 9 चौकाकडून हिंजवडी गावठाणाकडे जाणारी वाहतूक श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून सरळ पुढे जाऊन इंडियन ऑइल चौक, कस्तुरी चौक, विनोदे वस्ती मार्गे जाईल.

---

## तरूणांनी फुले दाम्पत्याचा आदर्श ठेवून वाटचाल करावी : अजित गव्हाणे




। पिंपरी ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

महाराष्ट्राच्या सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे योगदान अनमोल आहे. महात्मा फुले आणि समता हे शब्द जणू हातात हात घालून येतात. महिलांनाही पुरुषांइतकाच शिक्षणाचा अधिकार आहे असे केवळ महात्मा ज्योतिबा फुले बोलून थांबले नाहीत. तर, प्रत्यक्षात तसा अधिकार महिलांना मिळावा म्हणून त्यांनी आयुष्य वेचले. स्वत:च्या पत्नीपासून त्यांनी याची सुरुवात केली व पुढे महिलांसाठी शिक्षणाचा राजमार्ग खुला करून दिला. त्यांचे विचार भविष्यात प्रत्येकाच्या जीवनाला दिशा देत राहतील असे मत राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी व्यक्त केले. आजच्या तरूण पिढीने फुले दाम्पत्यांचा आदर्श ठेवून भविष्याची वाटचाल करावी, असेही ते म्हणाले.

क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त पिंपरी येथील ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले स्मारकातील क्रांतिसूर्य फुले यांच्या अर्धाकृती पुतळ्यास तसेच खराळवाडी येथील राष्ट्रवादीच्या पक्ष कार्यालयातील फुले यांच्या प्रतिमेस शहराध्यक्ष गव्हाणे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी गव्हाणे बोलत होते. याप्रसंगी महिला शहराध्यक्षा कविता आल्हाट, सामाजिक न्याय विभागाचे अध्यक्ष संजय औसरमल, ॲड.गोरक्ष लोखंडे, ओबीसी सेलचे अध्यक्ष विजय लोखंडे, महिला कार्याध्यक्षा कविता खराडे, ज्योती गोफणे, ज्ञानेश्वर कांबळे, कुमार कांबळे, राजू चांदणे,यश बोथ, निखिल घाडगे, मीरा कांबळे, ॲड. विद्या शिंदे, रजनी गोसावी, प्रदीप गायकवाड, संजय




## भूमिका

# चीनचा कावा वेळीच ओळखा..

**अरुणाचल प्रदेशावर चीन सातत्याने दावा सांगतोच आहे; पण हिंदी महासागर असो की भारताची शेजारी राष्ट्रे.. अशा सर्वच आघाडयांवर चीनचे कुरघोडी आणि वर्चस्वाचे डाव सुरू आहेत...**

अवाढव्य चीनची सीमा ही एकूण १४ देशांना लागून आहे. मात्र, सीमारेषेबाबत त्याचा केवळ भारताशीच वाद आहे. चीनच्या संरक्षण विभागाचे सर्वाधिक लक्ष हे भारतीय सीमेवरच केंद्रित आहे. हुकूमशाही असल्याने चीनमध्ये निर्णय प्रक्रिया अतिशय जलद आणि अंमलबजावणीची गतीही विलक्षण आहे. त्यांच्याकडे हवाई दल, नौदल, लष्कर, रॉकेट फोर्स आणि स्ट्रॅटेजिक फोर्स या पाच दलांचे एकच प्रमुख आहेत. ते घेतील त्या निर्णयाची तत्काळ अंमलबजावणी केली जाते.चीन संरक्षण क्षेत्रात भरीव तरतूद करीत आहे. त्यामुळेच जगातील सर्वात मोठे लष्कर चीनकडे आहे तर जगातील दुसऱ्या क्रमांकाचा संरक्षण अर्थसंकल्पही चीनचाच आहे. गेल्याच महिन्यातील आकडेवारीनुसार, चीनने संरक्षण निधीमध्ये तब्बल ७.२ टक्क्यांची वाढ केली आहे.



त्यांची संरक्षणासाठीची एकूण तरतूद २३१ अब्ज अमेरिकन डॉलर्स आहे. १० लढाऊ विमाने उतरू शकतील अशा युद्धनौकांपासून रडार, लढाऊ विमाने, आधुनिक रायफल्स, रणगाडे, क्षेपणास्त्रे, हेरगिरी करणारे उपग्रह, अण्वस्त्र चीनकडे आहे.चीनने तिबेटवर ताबा मिळविल्यानंतर तेथील धर्मगुरू दलाई लामा हे काही अनुयायांसह अरुणाचल प्रदेशमार्गे भारतात आले. त्यांच्यापाठोपाठ हजारो तिबेटी नागरिकही आले. भारतात त्यांच्या माध्यमातून फुटीरवाद्यांना बळ मिळू शकते म्हणूनही चीनचा भारतावर राग आहे. ही बाब दोन्ही देशांतील संबंधांवर परिणाम करणारी ठरते. ईशान्य भारतातील सातही राज्यांमध्ये तसेच तिबेट व चीनमध्येही बौद्ध धर्म अधिक मानला जातो. त्यातच दलाई लामा यांना मानणारा वर्ग या सातही राज्यांमध्ये मोठा आहे. त्यामुळेही चीन नाराज आहे.भारत आणि चीन या दोन देशांमधील सीमा जवळपास साडेतीन हजार किलोमीटर लांबीची आहे. अरुणाचल प्रदेश व चीन या दरम्यान असणाऱ्या सीमारेषेलाच मॅकमोहन रेषा असे म्हटले जाते.

हेन्री मॅकमोहन या ब्रिटिश अधिकाऱ्याच्या पुढाकारातून १९१४ मध्ये ही रेषा आखण्यात आल्याची नोंद आहे. यासाठी ब्रिटिश भारतीय सरकार आणि तिबेट सरकारमध्ये बैठक झाली. मात्र, या बैठकीला चीन हजर नसल्याने त्याला ही सीमारेषा मान्य नाही. अरुणाचल प्रदेश हा दक्षिण तिबेट असून तो आमचाच भाग आहे, असा दावा चीन वारंवार करतो. हिमाचल प्रदेशात दोन ठिकाणी भारत-चीन सीमारेषा आहे. एक सीमारेषा लडाखजवळ आहे. सिक्कीममध्ये नथुला येथे सीमारेषा आहे. तर अरुणाचल प्रदेशमध्ये तवांग जिल्ह्यातील बुमला पास येथे सीमारेषा आहे. काही वर्षांपूर्वी भारत, चीन आणि तिबेट या देशांच्या सीमेवर असलेल्या डोकलामवरून वाद निर्माण झाला होता.१९८८ मध्ये तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी चीनला भेट दिली. त्यानंतर सीमा प्रश्नावर दोन्ही देशांमध्ये चर्चा सुरू झाली. अंतिम निर्णय होत नाही तोवर दोन्ही देशांनी शांतता राखावी, शस्त्रास्त्रांचा वापर करू नये, मतभेद आहेत त्या ठिकाणाबाबत चर्चा करावी असा करार झाला. तसेच वादग्रस्त ठिकाणी कुठलीही विकासकामे किंवा लष्करी बांधकामे करायची नाहीत, असेही निश्चित झाले. मात्र, चीनकडून त्याचे पालन होत नसल्याचे वारंवार समोर येत आहे. त्यामुळेच अधूनमधून धुसफुस किंवा तणावाचे प्रसंग उद्भवत राहतात.पाकिस्तानपेक्षा चीन हा भारताचा शत्रू आहे, असे तत्कालीन संरक्षणमंत्री जॉर्ज फर्नांडिस यांनी सियाचीन भेटीत केलेले विधान जगभर गाजले. त्यानंतर दिल्लीत होऊ घातलेली जागतिक तिबेट परिषद होऊ नये यासाठी चीनने भारतावर दबाव टाकला. मात्र, जॉर्ज फर्नांडिस यांनी स्पष्ट केले की, भारत हा लोकशाही देश असून चीनला या परिषदेबाबत हस्तक्षेप करण्याचा काहीही अधिकार नाही. त्यानंतर ही परिषद पार पडली. दोन वर्षांपूर्वी भारत आणि चीन सैन्यात गलवान येथे मोठा हिंसक संघर्ष झाला. लडाख प्रदेशातील चीन सीमेवरील पँगाँग त्सो या तलावाच्या ठिकाणी चीनने मोठ्या प्रमाणात सैनिक आणले आणि तेथे बंकरही उभारले. हे उघड झाले ते ऑस्ट्रेलियन उपग्रहामुळे. त्यामुळेच बोभाटा सुरू झाला. भारत व चीनने जी सीमारेषा निश्चित केली आहे.

## संपादकीय »

### मोदीजी म्हणतात

*पंतप्रधानांनी नुकतीच 'आसाम ट्रिब्युन' या वृत्तपत्राला मुलाखत दिली.*

मोदींनी माध्यमांशी बोलणं, हेच मुळात कौतुकाचं. त्यामुळे चर्चा तर होणारंच. पंतप्रधानपदाच्या सलग १० वर्षांच्या कार्यकाळात त्यांनी देशात तरी एकही पत्रकार परिषद घेतलेली नाही. असं असलं, तरी 'मन की बात'मधून ते वरचेवर 'एक सो चालीस करोड' देशवासीयांशी थेट संवाद साधतात. आंबे कापून खाता की चोखून, वगैरे प्रश्नांचीही उत्तरं देण्यासाठी वेळ काढतात. देशातल्या अनेक बारीकसारीक घडामोडींविषयी समाजमाध्यमांवर व्यक्त होतात. अशाप्रकारे जनतेशी थेट संवाद साधत असल्यामुळे त्यांना पत्रकार परिषदांची गरजच भासत नसावी. असो... तर, ही मुलाखत चर्चेत आहे ती 'टाईमली इंटरव्हेन्शन' अर्थात वेळीच हस्तक्षेप या मुद्द्यावरून. मुलाखतीत मणिपूर संदर्भात विचारण्यात आलेल्या प्रश्नाला उत्तर देताना पंतप्रधान म्हणाले, 'मणिपूरमधला प्रश्न सोडवण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले.

घर फिरले की घराचे वासेही फिरतात' या म्हणीचा प्रत्यय आम आदमी पार्टीला एव्हाना आला असणार. 'ईडी'ने दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना मद्य घोटाळ्यात अटक केल्यानंतर पक्षाला एकापाठोपाठ एक धक्के बसू लागले आहेत.

# आता राजकीय 'आप'-घात?

दिल्ली सरकारमधील समाजकल्याणमंत्री राजकुमार आनंद यांनी पक्षावर होत असलेल्या गैरव्यवहाराच्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर मंत्रीपद तसेच पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा दिला. दोनच आठवड्यांपूर्वी पंजाबमधील जालंदरचे खासदार सुशीलकुमार रिंकू आणि पक्षाच्या एका आमदाराने भाजपमध्ये प्रवेश केला. पक्षाच्या विविध नेत्यांना 'ईडी'कडून चौकशीसाठी पाचारण केले जात आहे. केजरीवाल यांच्या अनुपस्थितीत किल्ला लढविणाऱ्या वित्तमंत्री अतिशी व सौरभ भारद्वाज, खासदार राघव चड्ढा आणि आणखी एका आमदारावर कारवाईची शक्यता आपकडून व्यक्त केली जात आहे. 'भाजपमध्ये सहभागी व्हा अन्यथा अटक होऊ शकते,' असे धमकविण्यात आल्याचा आरोप अतिशी यांनी केला. मद्य घोटाळ्यात कैलास गेहलोत या आणखी एका मंत्र्याची चौकशी करण्यात आली आणि त्यांनाही अटक होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. प्रसार माध्यमे आणि समाज




माध्यमातील चेहरा असलेले खासदार राघव चड्ढा डोळ्यांवरील शस्त्रक्रियेसाठी इंग्लडमध्ये गेले असून, तेथील मुक्काम त्यांनी वाढविला आहे. या प्रकरणातील आणखी एक आरोपी खासदार संजय सिंह यांना अलीकडेच मिळालेला जामीन ही 'ईडी'च्या एकंदर तपासावर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी बाब आहे आणि सुटका झाल्यापासून पक्षाची सूत्रे संजय सिंह यांनी हाती घेतली आहेत. पण पक्षाचे दहापैकी सात खासदार सध्या फारसे सक्रिय दिसत नाहीत. 'ईडी'ची वक्रदृष्टी लवकरच पक्षाची सत्ता असलेल्या पंजाबकडे वळू शकते, असा पक्षाच्या नेत्यांचा अंदाज आहे.गेल्या दोन-तीन वर्षांत भाजपने पद्धतशीरपणे शिवसेना, राष्ट्रवादी, हरयाणातील दुश्यंत चौटाला यांची जननायक जनता पार्टी, झारखंड मुक्ति मोर्चा, माजी पंतप्रधान देवेगौडा आणि नितीशकुमार यांचे जनता दल असे विविध छोटेमोठे प्रादेशिक पक्ष संपविले किंवा या पक्षांना घरघर लागली. यापुढील काळात आम आदमी पार्टीला नेस्तनाबूत करण्याचा भाजपचा प्रयत्न दिसतो. २०१५ आणि २०२० मध्ये भाजपच्या नाकावर टिच्चून आम आदमी पार्टीने दिल्ली विधानसभेत तीन चतुर्थांश बहुमत प्राप्त केले होते. पुढील वर्षाच्या सुरुवातीला दिल्ली विधानसभेची निवडणूक होणार आहे. या पार्श्वभूमीवर आपचे खच्चीकरण करण्याचा भाजपचा प्रयत्न असल्याचा आरोप पक्षाकडून करण्यात येतो. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या 'जनलोकपाल आंदोलना'तून आम आदमी पार्टीच्या स्थापनेची पाळेमुळे रोवली गेली. नागरी समाज चळवळीत सहभागी असलेल्यांनी निवडणुकीच्या राजकारणात पडावे का, यावरून आधी मतभिन्नता होती. पण चळवळीला मिळालेला पाठिंबा बघून राजकीय भूमिका घेतलीच पाहिजे.

## || अभंगवाणी ||



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# महायुतीत वादाची ठिणगी?

## ठाकरे गटाने अमोल किर्तीकर यांना उमेदवारी दिली

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मुंबईच्या उत्तर पश्चिम (वायव्य) लोकसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीतील शिवसेनेच्या ठाकरे गटाने अमोल किर्तीकर यांना उमेदवारी दिली आहे. उमेदवारी जाहीर होताच अमोल किर्तीकर यांची करोना काळात खिचडी वाटपात कथित गैरव्यवहार केल्याप्रकरणी ईडीकडून (सक्तवसुली संचालनालय) चौकशी सुरू झाली आहे. तर दुसऱ्या बाजूला अमोल किर्तीकर यांचे वडील आणि विद्यमान खासदार गजानन किर्तीकर हे शिंदे गटात आहेत.**

शिंदे गटाने अद्याप नाव जाहीर केलं नसलं तरी वायव्य मुंबईतून गजानन कीर्तिकरांना लोकसभेची उमेदवारी दिली जाणार असल्याचं बोललं जात आहे. स्वतः गजानन कीर्तिकर यांनी म्हटलं आहे की, मी माझ्या मुलाविरोधात लोकसभा निवडणूक लढवणार आहे. दरम्यान, गजानन कीर्तिकर यांनी काल (दि. ११ एप्रिल) गोरेगावमध्ये झालेल्या एका प्रचारसभेत त्यांचा मुलगा अमोल किर्तीकर यांच्यावर झालेल्या ईडीच्या कारवाईचा निषेध केला. तसेच पंतप्रधान मोदींवर शरसंधान साधले.गजानन किर्तीकर म्हणाले, “मी शिवसेनेत गेली ५७ वर्षे काम करत आहे. पण मी कधी लबाडी किंवा कपट-करस्थान केलं नाही. अमोल किर्तीकरांविरोधात मी प्रचार करणार आहे हे मी जाहीर केलं होतं, त्याप्रमाणे मी त्यांच्याविरोधात प्रचार करणार आहेच. पण अमोल किर्तीकर यांच्याविरोधात चालू असलेल्या ईडी चौकशीतून काहीही निष्पन्न होणार नाही. खिचडी घोटाळ्यातून काहीही हाती लागणार नाही, हे



ईडीचे अधिकारीही खासगीत मान्य करतात. भाजपाने यंदा ‘४०० पार’चा असा नारा दिला आहे. त्यामुळे त्यांनी ४०० जागांऐवजी संपूर्ण संसदच ताब्यात घ्यावी, मात्र दुसऱ्या बाजूला विरोधकांचाही सन्मान ठेवावा. विरोधकांच्या मागे केंद्रीय यंत्रणांचा ससेमिरा लावणे, ही भाजपाने आणलेली नवी संस्कृती आहे.गजानन कीर्तिकरांनी भाजपावर टीका केल्यानंतर यावर भाजपाकडूनही प्रतिक्रिया आली आहे. भाजपाचे आमदार अमित साटम यांनी याबाबत एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे, सध्या असं वाटतंय की, गजानन कीर्तिकरांचे केवळ शरीर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबरोबर आहे. मात्र त्यांचा आत्मा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याबरोबर आहे. कीर्तिकरांनी एकदा ठरवावं की ते कोणाबरोबर आहेत. मोदींचा चेहरा वापरून भाजपा कार्यकर्त्यांच्या जीवावर ते दोनदा खासदार झाले. भ्रष्टाचाऱ्यांनी इडीला घाबरण्याची आवश्यकता आहे. जर कर नाही तर डर कशाला? अमोल कीर्तिकर यांच्या बँक खात्यात खिचडीच्या कंत्राटदाराकडून ९५ लाख रुपये आलेच का? याचं उत्तर द्यावं. भ्रष्टाचाऱ्यांना आता सुट्टी (मोकळीक) नाही, कारवाई तर होणारच!मुंबईच्या उत्तर पश्चिम (वायव्य) लोकसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीतील शिवसेनेच्या ठाकरे गटाने अमोल किर्तीकर यांना उमेदवारी दिली आहे. उमेदवारी जाहीर होताच अमोल किर्तीकर यांची करोना काळात खिचडी वाटपात कथित गैरव्यवहार केल्याप्रकरणी ईडीकडून (सक्तवसुली संचालनालय) चौकशी सुरू झाली आहे.

### अधिकारीही खासगीत मान्य करतात

अमोल किर्तीकर यांचे वडील आणि विद्यमान खासदार गजानन किर्तीकर हे शिंदे गटात आहेत. शिंदे गटाने अद्याप नाव जाहीर केलं नसलं तरी वायव्य मुंबईतून गजानन कीर्तिकरांना लोकसभेची उमेदवारी दिली जाणार असल्याचं बोललं जात आहे. स्वतः गजानन कीर्तिकर यांनी म्हटलं आहे की, मी माझ्या मुलाविरोधात लोकसभा निवडणूक लढवणार आहे. दरम्यान, गजानन कीर्तिकर यांनी काल (दि. ११ एप्रिल) गोरेगावमध्ये झालेल्या एका प्रचारसभेत त्यांचा मुलगा अमोल किर्तीकर यांच्यावर झालेल्या ईडीच्या कारवाईचा निषेध केला. तसेच पंतप्रधान मोदींवर शरसंधान साधले.गजानन किर्तीकर म्हणाले, “मी शिवसेनेत गेली ५७ वर्षे काम करत आहे. पण मी कधी लबाडी किंवा कपट-करस्थान केलं नाही. अमोल किर्तीकरांविरोधात मी प्रचार करणार आहे हे मी जाहीर केलं होतं, त्याप्रमाणे मी त्यांच्याविरोधात प्रचार करणार आहेच. पण अमोल किर्तीकर यांच्याविरोधात चालू असलेल्या ईडी चौकशीतून काहीही निष्पन्न होणार नाही. खिचडी घोटाळ्यातून काहीही हाती लागणार नाही, हे ईडीचे अधिकारीही खासगीत मान्य करतात.

# राम मंदीराचा फार काही परिणाम वाटत नाही

## शिवतारेंच्या निवडणूक लढवण्याच्या भूमिकेवर शिंदेंनी सांगितला किस्सा

। नागपूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी अयोध्येतील राम मंदिरावरुन नरेंद्र मोदींना दगडात देव असतो का? असा प्रश्न विचारला आहे. तसंच ज्या लोकांनी मोदींना मतदान केलं ते लोक नाचत आहेत. मात्र मंदिरामुळे फारसा परिणाम झालाय असं वाटत असंही पृथ्वीराज चव्हाण म्हणाले.**

ज्या लोकांनी मोदींना मतदान केलं ते लोक नाचत आहेत. अयोध्येत राम मंदिर बांधलं



त्यामुळे फारसा काही परिणाम झाला आहे असं वाटत नाही. गावात खासगी मंदिर बांधणं आणि अयोध्येत राम मंदिर बांधणं यात काय फरक आहे? नरेंद्र मोदींना राम मंदिराचा राजकीय फायदा घ्यायचा होता. अयोध्येच्या बाहेर त्याचा प्रभाव नाही. नरेंद्र मोदी इमोशनल ब्लॅकमेलिंग का करतात?, दगडात देव असतो का? मला वाटलं तर मी कऱ्हाड येथील मंदिरात जाईन.मोदींनी मुद्दे घेऊन निवडणूक लढवली पाहिजे” असं परखड मत पृथ्वीराज चव्हाण यांनी मांडलं आहे.नरेंद्र मोदी आणि भाजपाचं सरकार घालवण्यासाठी सगळ्यांनी एकत्र आलं पाहिजे. बंडखोरी होते आहे असं लक्षात आलं तर त्या कार्यकर्त्यांना शांत केलं पाहिजे. महाविकास आघाडीत सारं काही आलबेल आहे. कोणत्या पक्षाने किती जागा लढवायच्या? यावर चर्चा झाली. त्यानंतर आम्ही दिल्लीतल्या पक्षाशी बोललो. जागांची अदलाबदल होऊ शकते त्यात काही हरकत नाही. मी पक्षाचं नाव घेणार नाही पण दोन पक्षांच्या चर्चेतून मार्ग निघू शकतो असंही पृथ्वीराज चव्हाण यांनी म्हटलं आहे. काही वेळापूर्वी त्यांनी एबीपी माझाशी संवाद साधला. त्यावेळी त्यांनी हे वक्तव्य केलं आहे.पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, जर कुणाकडे सक्षम पर्याय असेल तर विचार होऊ शकते. मतदारसंघाची वाटणी, इतिहास, स्थानिक पातळीवरची संघटना या संदर्भात मांडणी झालेली नाही.

### मंदिर बांधणं यात काय फरक आहे?

उशीर झाला आहे हे मान्य आहे. पण पहिल्यांदाच तीन पक्षांची आघाडी झाली आहे. अशोक चव्हाण यांना आम्ही चांगलं खातं देणार होतो. मात्र आता ते राज्याच्या राजकारणातून बाहेर गेले आहेत, असंही पृथ्वीराज चव्हाण म्हणाले आहेत. तसंच राष्ट्रीय पक्षांना निर्णय घ्यायला थोडा वेळ लागतो असंही पृथ्वीराज चव्हाण म्हणाले.माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी अयोध्येतील राम मंदिरावरुन नरेंद्र मोदींना दगडात देव असतो का? असा प्रश्न विचारला आहे. तसंच ज्या लोकांनी मोदींना मतदान केलं ते लोक नाचत आहेत. मात्र मंदिरामुळे फारसा परिणाम झालाय असं वाटत असंही पृथ्वीराज चव्हाण म्हणाले. ज्या लोकांनी मोदींना मतदान केलं ते लोक नाचत आहेत. अयोध्येत राम मंदिर बांधलं त्यामुळे फारसा काही परिणाम झाला आहे असं वाटत नाही. गावात खासगी मंदिर बांधणं आणि अयोध्येत राम मंदिर बांधणं यात काय फरक आहे?

# भारताची शस्त्रास्त्रे नष्ट करण्याचा कट

## पंतप्रधान नरेंद्र मोदींचा इंडिया आघाडीवर आरोप

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पाकिस्तानच्या सीमेला लागून असलेल्या राजस्थानमधील बाडमेर-जैसलमेर या लोकसभा मतदारसंघात आज (१२ एप्रिल) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जाहीर सभा पार पडली. राज्यातील क्षेत्रफळाच्या दृष्टीने सर्वात मोठा मतदारसंघ असलेल्या बाडमेर-जैसलमेर मधून भाजपाने कैलाश चौधरी यांना उमेदवारी दिली आहे. चौधरी यांच्या प्रचारासाठी स्वतः पंतप्रधानांनी प्रचारसभा घेतली. या प्रचारसभेत बोलताना पंतप्रधानांनी सीमा सुरक्षा, इंडिया आघाडी आणि आण्विक शस्त्रास्त्रांवर भाष्य केलं. मोदी म्हणाले, काँग्रेस आणि इंडिया आघाडी आपल्या देशातील आण्विक शस्त्रास्त्रं नष्ट करण्याचा कट रचत आहे.**

पंतप्रधान मोदी म्हणाले, काँग्रेसच्या काळात देशाच्या सीमावर्ती भागात अजिबात विकास झाला नाही. त्यांनी जाणून-बुजून विकास केला नाही, जेणेकरून आपल्या शत्रू राष्ट्रामध्ये लपून बसलेले आपले शत्रू या सगळ्याचा गैरफायदा घेऊन सहज आपल्या देशात यावेत. परंतु, भाजपा सरकारच्या काळात आपल्या शत्रूची इतकी हिंमत कधी झाली नाही. आपले शत्रू आपल्याकडे नजर उंच करून पाहू शकत नाहीत. आमच्यासाठी सीमेवरील गाव म्हणजे देशातलं शेवटचं गाव नाही तर ते देशातलं पहिलं गाव आहे. त्यामुळेच आम्ही सर्वात आधी आपल्या देशाच्या सीमा सुरक्षित केल्या. तसेच या भागात मोठ्या प्रमाणात विकासकामं केली.पंतप्रधान मोदी म्हणाले, काँग्रेसच्या काळात देशाच्या सीमावर्ती भागात अजिबात विकास झाला नाही. त्यांनी जाणून-बुजून विकास केला



नाही, जेणेकरून आपल्या शत्रू राष्ट्रामध्ये लपून बसलेले आपले शत्रू या सगळ्याचा गैरफायदा घेऊन सहज आपल्या देशात यावेत. परंतु, भाजपा सरकारच्या काळात आपल्या शत्रूची इतकी हिंमत कधी झाली नाही. आपले शत्रू आपल्याकडे नजर उंच करून पाहू शकत नाहीत. आमच्यासाठी सीमेवरील गाव म्हणजे देशातलं शेवटचं गाव नाही तर ते देशातलं पहिलं गाव आहे. त्यामुळेच आम्ही सर्वात आधी आपल्या देशाच्या सीमा सुरक्षित केल्या. तसेच या भागात मोठ्या प्रमाणात विकासकामं केली.पंतप्रधान मोदी म्हणाले, काँग्रेसच्या काळात देशाच्या सीमावर्ती भागात अजिबात विकास झाला नाही. त्यांनी जाणून-बुजून विकास केला नाही, जेणेकरून आपल्या शत्रू राष्ट्रामध्ये लपून बसलेले आपले शत्रू या सगळ्याचा गैरफायदा घेऊन सहज आपल्या देशात यावेत. परंतु, भाजपा सरकारच्या काळात आपल्या शत्रूची इतकी हिंमत कधी झाली नाही. आपले शत्रू आपल्याकडे नजर उंच करून

### तर ते देशातलं पहिलं गाव

» पंतप्रधान मोदी म्हणाले, काँग्रेसच्या काळात देशाच्या सीमावर्ती भागात अजिबात विकास झाला नाही. त्यांनी जाणून-बुजून विकास केला नाही, जेणेकरून आपल्या शत्रू राष्ट्रामध्ये लपून बसलेले आपले शत्रू या सगळ्याचा गैरफायदा घेऊन सहज आपल्या देशात यावेत. परंतु, भाजपा सरकारच्या काळात आपल्या शत्रूची इतकी हिंमत कधी झाली नाही. आपले शत्रू आपल्याकडे नजर उंच करून पाहू शकत नाहीत. आमच्यासाठी सीमेवरील गाव म्हणजे देशातलं शेवटचं गाव नाही तर ते देशातलं पहिलं गाव आहे. त्यामुळेच आम्ही सर्वात आधी आपल्या देशाच्या सीमा सुरक्षित केल्या. तसेच या भागात मोठ्या प्रमाणात विकासकामं केली.पंतप्रधान मोदी म्हणाले, काँग्रेसच्या काळात देशाच्या सीमावर्ती भागात अजिबात विकास झाला नाही. त्यांनी जाणून-बुजून विकास केला नाही, जेणेकरून आपल्या शत्रू राष्ट्रामध्ये लपून बसलेले आपले शत्रू या सगळ्याचा गैरफायदा घेऊन सहज आपल्या देशात यावेत. परंतु, भाजपा सरकारच्या काळात आपल्या शत्रूची इतकी हिंमत कधी झाली नाही. आपले शत्रू आपल्याकडे नजर उंच करून पाहू शकत नाहीत. आमच्यासाठी सीमेवरील गाव म्हणजे देशातलं शेवटचं गाव नाही तर ते देशातलं पहिलं गाव आहे.

पाहू शकत नाहीत. आमच्यासाठी सीमेवरील गाव म्हणजे देशातलं शेवटचं गाव नाही तर ते देशातलं पहिलं गाव आहे. त्यामुळेच आम्ही सर्वात आधी आपल्या देशाच्या सीमा सुरक्षित केल्या. तसेच या भागात मोठ्या प्रमाणात विकासकामं केली.

# डॉ. आंबेडकर स्वतः आले तरी संविधान संपवू शकत नाहीत

## संविधानाच्या नावावर खोटे बोलणे ही इंडिया आघाडीची फॅशन

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सध्या सुरु आहे. निवडणुकीच्या प्रचारात राजकीय नेते एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करताना पाहायला मिळत आहेत. इंडिया आघाडीकडून भाजपावर टीका करताना अनेकदा संविधान धोक्यात आल्याची टीका करण्यात येत आहे. या टीकेला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज (११ एप्रिल) राजस्थानमध्ये आयोजित रॅलीला संबोधित करताना काँग्रेसवर टीका करत प्रत्युत्तर दिले आहे. "डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वतः जरी आले तरी संविधान संपवू शकत नाहीत", असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.**

एससी, एसटी, ओबीसींबरोबर अनेक दशकांपासून भेदभाव करणारी काँग्रेस आजकाल एक जुने रेकॉर्ड वाजवत आहे. जेव्हा निवडणूक येते तेव्हा संविधानाच्या नावावर खोटे बोलणे ही इंडिया आघाडीची फॅशन झाली आहे. ज्या काँग्रेसने डॉ.बाबासाहेब आंबेडकर हयात असताना त्यांना निवडणुकीत हरवले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना काँग्रेसने भारतरत्न मिळू दिला नाही. ज्या काँग्रेसने देशात आणीबाणी लावली, संविधान संपवण्याचा प्रयत्न केला, आज तीच काँग्रेस मला शिव्या देण्यासाठी संविधानाच्या नावाखाली खोटे बोलत आहे", असे पंतप्रधान मोदी म्हणाले.सरकारच्या परिपत्रकामुळे हे स्पष्ट झालं आहे की बौद्ध हा वेगळा धर्म आहे आणि त्याचा हिंदू धर्माशी संबंध नाही. प्रशासनातल्या काही जणांनी संभ्रमाचं वातावरण निर्माण केलं होतं ते या पत्रकामुळे दूर झालं आहे असं बनकर यांनी म्हटलं आहे.पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले, "पण हे ते मोदी आहेत, त्यांनी देशात पहिल्यांदा संविधान दिवस साजरा करण्याची सुरुवात



केली. याच काँग्रेसवाल्यांनी संविधान दिवस साजरा करायला विरोध केला होता. याबाबतचे त्यांचे संसदेमध्ये भाषणदेखील आहे. मग डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा हा अपमान आहे की नाही? हा संविधानाचा अपमान आहे की नाही? एवढेच नाही, हे ते मोदी आहेत, ज्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी संबंधित पंचतीर्थांचा विकास केला. त्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि संविधानाचा अपमान करणाऱ्या काँग्रेस आणि इंडिया आघाडीच्या खोटेपणापासून सावध राहण्याची गरज आहे", असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले, "काँग्रेसल्यांनी हे लक्षात ठेवावे, ४०० जागांचे ध्येय जनतेने यासाठी ठेवले की, गेल्या १० वर्षात तुम्ही मला संसदेत चांगले काम करण्यापासून रोखण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे देश काँग्रेसला शिक्षा देऊ इच्छित आहे. काँग्रेसला देशातून साफ कण्याचा प्रयत्न करत आहे. जेथे संविधानाचा प्रश्न

### आजकाल एक जुने रेकॉर्ड वाजवत आहे

» लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सध्या सुरु आहे. निवडणुकीच्या प्रचारात राजकीय नेते एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करताना पाहायला मिळत आहेत. या टीकेला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज (११ एप्रिल) राजस्थानमध्ये आयोजित रॅलीला संबोधित करताना काँग्रेसवर टीका करत प्रत्युत्तर दिले आहे. "डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वतः जरी आले तरी संविधान संपवू शकत नाहीत",एससी, एसटी, ओबीसींबरोबर अनेक दशकांपासून भेदभाव करणारी काँग्रेस आजकाल एक जुने रेकॉर्ड वाजवत आहे. जेव्हा निवडणूक येते तेव्हा संविधानाच्या नावावर खोटे बोलणे ही इंडिया आघाडीची फॅशन झाली.

आहे तेथे तुम्ही माझे शब्द लिहून ठेवा. डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वतः आले तरी ते संविधान संपवू शकत नाहीत. संविधान सरकारसाठी गीता, रामायण, महाभारत, बायबल, कुराण आहे. हे सर्व आमच्यासाठी संविधान आहे. हे इंडिया आघाडीवाले द्वेषाने भरलेले आहेत", असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.एससी, एसटी, ओबीसींबरोबर अनेक दशकांपासून भेदभाव करणारी काँग्रेस आजकाल एक जुने रेकॉर्ड वाजवत आहे. जेव्हा निवडणूक येते तेव्हा संविधानाच्या नावावर खोटे बोलणे ही इंडिया आघाडीची फॅशन झाली आहे. ज्या काँग्रेसने डॉ.बाबासाहेब आंबेडकर हयात असताना त्यांना निवडणुकीत हरवले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना काँग्रेसने भारतरत्न मिळू दिला नाही. ज्या काँग्रेसने देशात आणीबाणी लावली, संविधान संपवण्याचा प्रयत्न केला, आज तीच काँग्रेस मला शिव्या देण्यासाठी संविधानाच्या नावाखाली खोटे बोलत आहे", असे पंतप्रधान मोदी म्हणाले.सरकारच्या परिपत्रकामुळे हे स्पष्ट झालं आहे.

# मी वडिलांच्या पैशांवर जगतो : आयुष



अभिनेता आयुष शर्माने सलमान खानची बहीण अर्पिता खानशी लग्न केलं आहे. आयुषने सलमानला पहिल्यांदा भेटला तेव्हा काय घडलं होतं याबाबत माहिती दिली आहे. सलमानला पहिल्यांदा भेटलो तेव्हा मी पैसे कमवत नव्हतो, असं तो म्हणाला. अर्पिता व आयुष एकमेकांना काही महिन्यांपासून डेट करत होते आणि त्याचदरम्यान आयुष सलमानला त्याच्या घरी गॅलेक्सी अपार्टमेंटमध्ये भेटला होता. भारती सिंग आणि हर्ष लिंबाचिया यांना दिलेल्या मुलाखतीत आयुषने सांगितलं की एके दिवशी उशीरा रात्री तो अर्पिताला सोडायला घरी गेला होता. अर्पिताने त्याला घरात बोलावलं, सुरुवातीला आयुष संकोच करत होता, पण अर्पिताने त्याला निवांत राहा असं सांगितलं. रात्रीच्या १ वाजता ते सर्वजण जेवत होते आणि टीव्ही पाहत होते, तिथे सलमान खान आला. “तो तिथे आला आणि मी त्याच्या मागे उभा होतो. माझ्या डोक्यात फक्त प्यार किया तो डरना क्या हेच विचार सुरू होते, तो मागे वळला आणि मी स्वतःची ओळख करून दिली, ‘हाय सर, मी आयुष शर्मा’. तो म्हणाला, ‘मी सलमान खान आहे’. आणि यानंतर मी तिथून निघालो,” असं आयुष म्हणाला.

# ‘स्वातंत्र्य वीर सावरकर’ चित्रपटाचं मूळ बजेट किती?



स्वातंत्र्य वीर सावरकर’ चित्रपट २२ मार्च रोजी हिंदी व मराठी दोन भाषांमध्ये प्रदर्शित झाला. या चित्रपटाला बॉक्स ऑफिसवर २० दिवस पूर्ण झाले आहेत. २० दिवसात या चित्रपटाने समाधानकारक कामगिरी केली आहे. चित्रपटाच्या बॉक्स ऑफिस कलेक्शनची आकडेवारी समोर आली आहे, त्यानुसार त्याने २० कोटींहून जास्त कमाई केली आहे. अशातच या चित्रपटाचं बजेट किती आहे, त्याबाबत जाणून घेऊयात. ‘स्वातंत्र्य वीर सावरकर’ या चित्रपटात रणदीप हुड्डाने मुख्य भूमिका साकारली असून दिग्दर्शनही त्यानेच केलं आहे. वीर सावरकर यांचा जीवन प्रवास सांगणारा ‘स्वातंत्र्य वीर सावरकर’ हा सिनेमा तयार करण्यासाठी आपल्याला वडिलांची मालमत्ता विकावी लागली, असं रणदीप मुलाखतीत म्हणाला होता. वडिलांनी मुंबईत घेतलेली मालमत्ता विकून या चित्रपटाची निर्मिती केली, असं रणदीपने सांगितलं. त्याच्या या विधानाची व चित्रपटाची खूप चर्चा आहे, अशातच चित्रपटाचं बजेट किती? असा प्रश्न अनेकांना पडत आहे.‘स्वातंत्र्य वीर सावरकर’ या चित्रपटासाठी रणदीप हुड्डा व इतर निर्मात्यांनी मिळून २० कोटी रुपयांचा खर्च केला आहे. ‘टाइम्स ऑफ इंडिया’ च्या वृत्तानुसार, या चित्रपटाचे बजेट २० कोटी रुपये आहे आणि बॉक्स ऑफिसवर या सिनेमाने तीन आठवड्यांत २१.९ कोटी रुपयांची कमाई केली आहे, यासंदर्भात इंडस्ट्री ट्रॅकर ‘सॅकनिल्क’ने वृत्त दिलं आहे.‘स्वातंत्र्य वीर सावरकर’ या चित्रपटाचं एकूण बॉक्स ऑफिस कलेक्शन पाहता निर्मात्यांनी खर्च केलेली रक्कम तरी नक्कीच वसूल केली आहे. चित्रपट अजूनही काही ठिकाणी सिनेमागृहांमध्ये दाखवला जात आहे. त्यामुळे चित्रपटाच्या एकूण कलेक्शनमध्ये वाढ होऊ शकते. या चित्रपटात रणदीप हुड्डासह अंकिता लोखंडे व अमित सियाल यांच्या महत्त्वाच्या भूमिका आहेत.

# आता भाजपा हेच माझं अस्तित्व

अभिनेत्री कंगना रणौतने आज कुलू या ठिकाणी प्रचारसभा घेतली. या प्रचारसभेत कंगनाने विविध मुद्द्यांवर भाष्य केलं. लोकसभा निवडणूक १९ एप्रिलपासून सुरु होती आहे. कंगना रणौतला भाजपाने हिमाचलच्या मंडीमधून तिकिट दिलं आहे. त्यानंतर कंगनाने भाजपाचा जोरदार प्रचार करण्यास सुरुवात केली आहे. कंगना रणौतने आज मी माझं अस्तित्व विसरले आहे भाजपा हेच माझं अस्तित्व आहे असं म्हटलं आहे. तसंच नरेंद्र मोदींमध्ये रामाचा अंश असल्याचाही पुनरुच्चार केला आहे.“२०१४ मध्ये आपल्या सगळ्यांना चेतना फुलवण्याचं काम पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केलं. हिंदू राष्ट्र आणि सनातन यांची चेतना पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जागृत केली. अधर्माच्या विरोधात धर्माची लढा सुरु झाला. ही चेतना आता सगळ्या देशभरात पसरली आहे. आम्ही सगळे श्रीरामाचे सेवक आहोत. आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी हे रामाचा अंश आहेत. रामाच्या फक्त मूर्तीची पूजा होत नाही. रामाच्या चरित्राची पूजा करणारा आपला देश आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींमध्ये प्रभू रामाचा संयम, प्रभू रामाचा दयाभाव हे सगळं आहे. माझा त्यांच्या सेनेत खारीचा वाटा आहे.



# विद्या व प्रतीक यांची खास मुलाखत

इंडियन एक्सप्रेस’ आपली नवीन सहा भागांची मालिका ‘एक्सप्रेसो’ आज लॉंच करत आहे. या मालिकेच्या पहिल्या भागात दोन स्टार कलाकार हजेरी लावणार आहे. अभिनेत्री विद्या बालन आणि प्रतीक गांधी यांच्या मुलाखतीने या मालिकेची सुरुवात होणार आहे. हे दोघेही लवकरच ‘दो और दो प्यार’ या चित्रपटात एकत्र दिसणार आहेत. ‘एक्सप्रेसो’ हा तास-दीड तासांचा लाइव्ह कार्यक्रम आहे. यात प्रेक्षकांनाही प्रश्न विचारण्याची संधी मिळेल. हा कार्यक्रम मुंबईतील ताज लॅंड्स एंड इथं पार पडतोय. यात ते त्यांचे करिअर, आयुष्य, लग्न चित्रपट आणि सर्व आवडत्या गोष्टींसह अनेक विषयांवर मनमोकळेपणाने गप्पा मारणार आहेत. कार्यक्रम तुम्हाला खाली दिलेल्या इंडियन एक्सप्रेसच्या युट्यूब चॅनलवर पाहता येईल.

# एकेकाळी खोटे दागिने विकले, ऑफिस बॉयची केली नोकरी

बॉलीवूड अभिनेता अक्षय कुमार सध्या त्याच्या ‘बड़े मियां छोटे मियां’ या चित्रपटामुळे चर्चेत आहे. नुकताच प्रदर्शित झालेला अक्षयचा हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर जबरदस्त कमाई करताना दिसत आहे. ‘बड़े मियां छोटे मियां’ या चित्रपटाला प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद मिळत आहे. या चित्रपटात अक्षयसह अभिनेता टायगर श्रॉफ झळकला आहे. अशातच एका मुलाखतीमधून अक्षयने पहिली नोकरी व पहिल्या पगारविषयी खुलासा केला आहे. ‘बड़े मियां छोटे मियां’ चित्रपटाच्या निमित्ताने अक्षय व टायगरने ‘कर्ली टेल्स’ या युट्यूब चॅनेलला मुलाखत दिली. यावेळी अक्षयला त्याच्या पहिल्या पगाराविषयी विचारण्यात आलं. तेव्हा अक्षय म्हणाला की, मी १५, १६ वर्षांचा होता, तेव्हा मी कोलकातामधील ट्रॅव्हल एजन्सीमध्ये पहिली नोकरी केली होती. तिथे ऑफिस बॉयचं काम करायचो. या नोकरीचे मला १५० ते २०० रुपये मिळायचे.त्यानंतर अभिनेत्याला विचारलं, कमवायची एवढी घाई का होती? यावर अक्षय म्हणाला, “जेव्हा माणूस शिकलेला नसतो, तेव्हा तो कोणतीही नोकरी करणारच ना. ही एकमेव नोकरी होती, जी मला लगेच मिळाली होती. त्यानंतर मी ढाकाला गेलो. तिथल्या एका हॉटेलमध्ये काम केलं. मग मी बँकॉकला गेलो.”पुढे अक्षय म्हणाला, “काही दिवसांनंतर बँकॉकहून दिल्लीला आलो. तिथे काम केलं. तेव्हा मी खोटे दागिने विकायचो. दिल्लीतून घेऊन मुंबईत विकायचो.

# दिल्लीचा लखनऊवर 6 विकेट्सनी विजय

## दिल्ली कॅपिचल्सने 18.1 षटकांत 4 बाद 170 धावा केल्या

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**आयपीएल २०२४ मधील २६वा सामना शुक्रवारी लखनऊ येथे पार पडला. या सामन्यात लखनऊ सुपरजायंट्स आणि दिल्ली कॅपिटल्स आमनेसामने होते. ज्यामध्ये दिल्ली कॅपिटल्सने लखनऊ सुपरजायंट्सवर ६ विकेट्सनी विजय मिळवला. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना लखनऊने आयुष बडोनीच्या नाबाद अर्धशतकाच्या जोरावर दिल्लीसमोर १६८ धावांचे लक्ष्य ठेवले होते. मात्र, प्रत्युत्तरात दिल्लीने पदार्पणवीर जेक फ्रेझर मॅकगर्कच्या अर्धशतकाच्या जोरावर ४ गडी गमावून विजयावर शिक्कामोर्तब केला.**



१६८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करणाऱ्या दिल्लीची सुरुवात चांगली झाली नाही. कारण डेव्हिड वॉर्नर केवळ ८ धावा करून बाद झाला. त्याच्यानंतर पृथ्वी शॉने जबाबदारी स्वीकारली, पण मागील सामन्याप्रमाणे त्याला अर्धशतक झळकावता आले नाही. तो २२ चेंडूत ३२ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. दिल्लीने पूर्वार्धात अतिशय संथ फलंदाजी केली, मात्र त्यानंतर ऋषभ पंत आणि नवोदित जेक फ्रेझर मॅकगर्क यांनी तुफानी शैलीत फलंदाजी केली. एकीकडे पंतने २४ चेंडूत ४१ धावांची खेळी खेळली, ज्यात त्याने ४ चौकार आणि २ षटकार मारले. तर मॅकगर्कने ३५ चेंडूत ५५ धावा केल्या. त्या ने २ चौकार आणि ५ षटकारही मारले.दिल्ली कॅपिटल्सची पहिल्या १० षटकांत धावसंख्या २ बाद ७५ धावा होती, पण येथून डीसीच्या फलंदाजांनी वेग पकडण्यास सुरुवात केली. ऋषभ पंत आणि मॅकगर्क यांनी पुढच्या २४ चेंडूत ६१ धावा केल्या आणि ४ षटकांच्या या कालावधीत दोघांनी मिळून ५ गगनचुंबी षटकार आणि ४ चौकार लगावले. पण पंधराव्या षटकात मॅकगर्क आणि पुढच्याच षटकात ऋषभ पंत बाद झाल्याने सामना अडकलेला दिसत होता. पंत आणि मॅकगर्क यांच्यात ७७ धावांची भागीदारी झाली. दिल्लीला २ षटकात फक्त १० धावा हव्या होत्या.

त्यावेळी शाई होप आणि ट्रिस्टन स्टब्स यांनी घाई न करता ११ चेंडू शिल्लक असताना दिल्लीचा ६ गडी राखून विजय मिळवून दिला. लखनऊकडून रवी बिश्नोईने दोन तर नवीन-उल-हक आणि यश ठाकूर यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

लखनौ आणि दिल्ली यांच्यातील या सामन्यात युवा खेळाडूंनी वर्चस्व गाजवले. तत्पूर्वी, लखनऊने अवघ्या ७४ धावांत ७ विकेट्स गमावल्या होत्या, मात्र त्यानंतर आयुष बडोनीने ३५ चेंडूत ५५ धावा केल्या आणि अर्शद खाननेही १६ चेंडूत २० धावा करत लखनौला १६७ धावांपर्यंत पोहोचवले. दिल्लीकडून कुलदीप यादवने शानदार गोलंदाजी केली. त्याने ४ षटकात २० धावा देत ३ विकेट्स घेतल्या. खलील अहमदने २ विकेट्स घेतल्या. मुकेश कुमार आणि इशांत शर्मा यांना प्रत्येकी एक विकेच घेतली. दरम्यान, अर्शद खाननेही गोलंदाजीत आपली लाईन, लेन्थ आणि गतीने प्रभावित केले. दुसरीकडे, दिल्लीकडून जेक फ्रेझर मॅकगर्कने पदार्पणाच्याच सामन्यात ५५ धावांची शानदार खेळी करत संघाच्या विजयात मोलाचे योगदान दिले. आयपीएल २०२४ मधील २६वा सामना शुक्रवारी लखनऊ येथे पार पडला.

### युवा खेळाडूंचे राहिले वर्चस्व

» १६८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करणाऱ्या दिल्लीची सुरुवात चांगली झाली नाही. कारण डेव्हिड वॉर्नर केवळ ८ धावा करून बाद झाला. त्याच्यानंतर पृथ्वी शॉने जबाबदारी स्वीकारली, पण मागील सामन्याप्रमाणे त्याला अर्धशतक झळकावता आले नाही. तो २२ चेंडूत ३२ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. दिल्लीने पूर्वार्धात अतिशय संथ फलंदाजी केली, मात्र त्यानंतर ऋषभ पंत आणि नवोदित जेक फ्रेझर मॅकगर्क यांनी तुफानी शैलीत फलंदाजी केली. एकीकडे पंतने २४ चेंडूत ४१ धावांची खेळी खेळली, ज्यात त्याने ४ चौकार आणि २ षटकार मारले. तर मॅकगर्कने ३५ चेंडूत ५५ धावा केल्या. त्या ने २ चौकार आणि ५ षटकारही मारले.दिल्ली कॅपिटल्सची पहिल्या १० षटकांत धावसंख्या २ बाद ७५ धावा होती.

# विराट कोहलीची निवड होणार नाही?

## विराट कोहली टी-20 विश्वचषकासाठी भारतीय संघात सामील होणार की नाही?

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**आयपीएल २०२४ च्या हंगामानंतर अमेरिका आणि वेस्ट इंडिजमध्ये टी-२० विश्वचषक २०२४ स्पर्धेच आयोजन केले जाणार आहे. विराट कोहली या स्पर्धेसाठी भारतीय संघात सामील होणार की नाही, अशी चर्चा अनेक दिवसांपासून सुरू आहे. आयपीएलच्या चालू मोसमातील कोहलीची कामगिरी पाहता हा भारतीय स्टार जूनमध्ये होणाऱ्या या जागतिक स्पर्धेत स्थान मिळवण्यात यशस्वी होईल, असे दिसते. तथापि, आयपीएलमध्ये आरसीबीकडून कोहलीबरोबर खेळणारा ग्लेन मॅक्सवेलला वाटते की टी-२० विश्वचषकासाठी कोहलीची भारतीय संघात निवड होऊ नये.**




"विराट कोहली हा खूप चांगला खेळाडू आहे, त्याच्याविरुद्ध मी खेळलो आहे. तुम्ही त्याच्या कारकिर्दीकडे बघा, त्याचा टूर्नामेंटमधील रेकॉर्ड किती उत्कृष्ट आहे. २०१६ च्या टी-२० विश्वचषकादरम्यान त्याने मोहालीमध्ये आमच्याविरुद्ध खेळलेली खेळी ही सर्वोत्तम खेळीपैकी एक होती. यामुळे संपूर्ण स्पर्धेचा चेहरामोहराच बदलून गेला."ग्लेन मॅक्सवेल पुढे म्हणाला, "विराट कोहली विसंगत असलेल्या खेळपट्टीवर वेगवेगळ्या भागात शॉट्स खेळत होता. त्याच्याकडे शेवटच्या क्षणी हाताची स्थिती बदलण्याची क्षमता आहे आणि तो टेबल टेनिसच्या बॅटप्रमाणे फ्लिक करतो. ही अशी गोष्ट आहे ज्याला जगात तोड नाही. त्याची सतर्कताही उत्कृष्ट आहे. कोहलीसोबत सराव करणे आणि त्याला पाहणे खूप छान आहे, पण मलाही त्याच्याविरुद्ध खेळावे लागते. त्यामुळे मला वाटते की भारताने कोहलीची निवड करु नये."आयपीएलमध्ये कोहलीची बॅट पुन्हा एकदा तळपताना दिसत असून त्याने आतापर्यंत दोन अर्धशतके आणि एक शतक झळकावले आहे. आयपीएलच्या चालू हंगामात त्याने सहा सामन्यांत ३१९ धावा केल्या आहेत. तो सध्या लीगमध्ये सर्वाधिक धावा करणारा खेळाडू आहे. त्यामुळे ऑरेंज कॅपच्या शर्यतीत आघाडीवर आहे. मात्र, त्याच्या स्ट्राइक रेटवर सातत्याने प्रश्न उपस्थित केले जात आहेत. गेल्या वर्षी भारतात झालेल्या एकदिवसीय विश्वचषकात ग्लेन मॅक्सवेलने तुफानी फलंदाजी केली आणि ऑस्ट्रेलियाला विजय मिळवून देण्यात त्याची भूमिका महत्त्वाची होती. मात्र, आयपीएलच्या चालू मोसमात मॅक्सवेलची बॅट अजूनही शांत असून तो धावा काढण्यासाठी धडपडताना दिसत आहे. मुंबई इंडियन्सविरुद्ध मॅक्सवेल खातेही न उघडता बाद झाला.

### दिनेश कार्तिकशी बरोबरी साधली

» .मॅक्सवेल शून्यावर पॅव्हेलियनमध्ये परतण्याची त्याची आयपीएल कारकिर्दीतील ही १७वी वेळ होती. यादरम्यान त्याने एक नकोसा विक्रम आपल्या नावावर केला. आयपीएलच्या इतिहासात सर्वाधिक वेळा खाते न उघडता बाद होणारा तो खेळाडू आहे. या बाबतीत मॅक्सवेलने रोहित शर्मा आणि दिनेश कार्तिकशी बरोबरी साधली आहे. आयपीएल २०२४ च्या हंगामानंतर अमेरिका आणि वेस्ट इंडिजमध्ये टी-२० विश्वचषक २०२४ स्पर्धेच आयोजन केले जाणार आहे.